<u>विशेष दिवाणी दावा क्र.१४८/२०२५</u>

## निशाणी क्र. १७ वरील आदेश

( सुभाष सुराणा वि. मंदाकिनी उंबरे वगैरे )

वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचा अर्ज संयुक्तपणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जातील कथन थोडक्यात असे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द अतिक्रमण केलेल्या जागेचा कब्जा व आज्ञार्थी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने वादीची मौजे चिखलठाण येथील सि.स.क्र.१६० व प्रतिवादीच्या सि.स.नं.१६१ ची उप–अधिक्षक भूमी अभिलेख, करमाळा यांनी मोजणी करुन मौजे चिखलठाण येथील सि.स.नं.१६० व सि.स.नं.१६१ ची मोजणी करुन हद्दी खुणा फिक्स करणेत यावेत व वादीच्या सि.स.नं.१६० मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी किती क्षेत्रात अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे हे लाल रंगाच्या खुणाने दाखविण्यात यावे. वादीच्या मालकीचे सि.स.नं.१६० चे क्षेत्र २२५ चौ.मीटर व प्रतिवादीचे सि.स.नं.१६१ क्षेत्र ११४.७० चौ.मी. या दोन्ही सिटी स.नंबरचे क्षेत्र मोजून त्याचे क्षेत्र नकाशात नमूद करणेत यावे. वादी व प्रतिवादी मोजणीचा खर्च करणेस तयार आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज व दाव्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने अतिक्रमण जागेचा कब्जा मिळणेसाठी तसेच आज्ञार्थी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे. सदर बाबीची सत्यता न्यायालयासमोर येण्याकरीता सि.स.नं.१६० व सि.स.नं.१६१ ची मोजणी होणे आवश्यक आहे. सि.स.नं.१६० व १६१ चे मोजणी झाल्यानंतर प्रतिवादींकडून अतिक्रमण झाले किंवा नाही याबाबी निश्चित होतील. सदरचा अर्ज वादी व प्रतिवादी यांनी संयुक्तपणे दाखल केलेला आहे तसेच अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ च्या कक्षेत येत असल्याने मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. संबंधीत अधिकाऱ्याने अतितात्काळ मोजणी फी घेवून प्रशिक्षीत मोजणीदार यांचे मार्फत मोजणी करण्याबाबत आदेशीत करण्यात येते.

३. वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी अतितात्काळ मोजणी फी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचे कार्यालयात भरुन अहवाल सादर करावा तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी.

४. न्यायालयीन आयुक्तांनी मौजे चिखलठाण येथील सिटी सर्वे नं.१६० व सि.स.नं.१६१ ची वादी व प्रतिवादीं यांचे समक्ष मोजणी करुन कोणी किती जागेत अतिक्रमण केले तसेच अतिक्रमण असेल तर अतिक्रमण केलेले क्षेत्र दर्शवून तसेच अतिक्रमीत क्षेत्र लाल रंगाने दर्शवून तसा नकाशा तयार करुन त्यामध्ये सदरच्या हद्दीखुणा चिन्हांकित करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात एक महिन्याच्या आत पाठवावा.

५. संबंधित लिपिक यांना आदेशित करण्यात येते की, वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी मोजणी फी भरल्याची पावती तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याबरोबर भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे मोजणीकरीता रिट त्वरीत पाठवावी.

६. वादी व सर्व प्रतिवादींनी मोजणी करिता तालुका भूमी अभिलेख कार्यालय,करमाळा यांचेकडे स्वतः संपर्क साधून मोजणी विहित मुदतीत करण्याकरिता सहकार्य करावे व मोजणी वेळी हजर रहावे.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2025.09.20 16:02:49 +0530

( संजय मो. घुगे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, करमाळा

स्थळ – करमाळा
दिनांक – १९.०९.२०२५

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | | 19.09.2023 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 19.09.2023 |
| Order uploaded on | : | 20.09.2023 |